| नियमित दिवाणी दावा क्र.२०९/२०२५ मधील निशाणी क्र.२६खालील आदेश<br>(अनिल भळगट विरुध्द धनराल भळगट व इतर) | CNR-MHAH140003222025 |
|---|---|

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकरीता दाखल केला आहे. अर्जासोबत वादीने शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने कथन केले आहे की, प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना दिनांक १६/०६/२०२५ रोजी खरेदीखत दस्त क्र. ४०१०/२०२५ अन्वये प्रतिवादींनी दावा मिळकत कलम ब मधील मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ व भागयश्री किरण भंडारी यांना हस्तांतर केले आहे. त्यामुळे भाग्यश्री किरण भंडारी यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.५ म्हणून सामील करुन पॅरा क्र. ७अ मध्ये सदर खरेदीखत हे बेकायदीशीर असून ते वादीवर बंधनकारक नाही, पॅरा क्र. १३ मधील विनंती कलम अ च्या खाली सदर खरेदीखत दस्त क्र. ४०१०/२०२५ हे वादीवर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव मिळावा, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दावा मिळकत कलम १अ च्या कब्जेवहिवाटीस बेकायदेशीर हरकत करू नये व दावा मिळकत कलम १ब चे कोणासही हस्तांतर करू नये असा निरंतर ताकीद मनाई हुकूम प्रतिवादी क्र. १ ते ५ विरूध्द मिळावा हा मजकूर समाविष्ठ करायचा आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती दाव्यातील जुन्या कथनाला धरुन असल्याने अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांना प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. तसेच प्रस्तावित प्रतिवादी यांना नोटीस बजावणी होवूनही ती दाव्यात हजर राहिली नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

४. वादी तर्फे मा. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत दावा हा वादीने जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दाव्यातील मिळकत प्रतिवादी यांनी भाग्यश्री किरण भंडारी हिला विक्री केलेली असल्याने तिला प्रतिवादीपणात सामील करावे व त्याप्रमाणे विनंती कलमात दुरुस्ती करण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकत दावा प्रलंबित असताना हस्तांतर केलेली असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम १० (१) अन्वये खरेदीदारास दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूत अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती दाव्याचा पूर्णतः गुणदोषावर निकाल होणेसाठी आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे आहे, त्यामध्ये अद्याप पुरावा सुरू झालेला नाही व दावा मिळकतीमध्ये वादी प्रतिवादी यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. तसेच दाव्याचा गुणदोषावर पूर्णतः निकाल होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांना दाव्यातील दुरुस्तीच्या अनुषंगाने म्हणणे व पुरावा देण्याची संधी आहे या सर्व बाबींचा विचार करता वादीचा प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व रास्त ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. २६ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत प्रस्तुत आदेश तारखेपासुन १४ दिवसांमध्ये दाखल करावी.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.09.25 17:58:16 +0530

**(संध्या यु. सुळ)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – २५/०९/२०२५